महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९१२३९१४
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक: डीआरए-५२२/प्र.क्र.८८/२०२२/२१ दिनांक : २० जुलै, २०२३

**-: प्रसिध्दीपत्रक :-**

**विषय** :- विशिष्ट शैक्षणिक अर्हता आणि/ अथवा अनुभवावर आधारित चाळणी परीक्षांच्या निकालाबाबत.

**संदर्भ** :-जाहिरात क्रमांक - ०३/२०२० व ०४/२०२०

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे आयोजित संगणक प्रणालीवर आधारित खालील चाळणी परीक्षांचा निकाल आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे :-

| अ.क्र | जाहिरात क्रमांक | जाहिरात दिनांक | संवर्ग | परीक्षा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | ०३/२०२० | ३१/०१/२०२० | सहायक आयुक्त, मत्स्यव्यवसाय/ प्रकल्प व्यवस्थापक, दापचरी, (तांत्रिक), महाराष्ट्र मत्स्यसेवा गट-अ (कृषि, पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग) | २०/०१/२०२३ |
| २ | ०४/२०२० | ३१/०१/२०२० | मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी, मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण अधिकारी, अभिरक्षक, प्रशिक्षण व विस्तार अधिकारी (तांत्रिक), महाराष्ट्र मत्स्यसेवा गट-ब) (कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग) | २०/०१/२०२३ |

२. प्रस्तुत निकालानुसार प्रथमदर्शनी पात्र ठरलेल्या उमेदवारांची पात्रता तपासल्यानंतर पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना मुलाखतीस बोलविण्यात येईल. जाहिरातीमधील तरतुदीनुसार विविध दावे तपासताना वा अन्य कारणामुळे अपात्र ठरणाऱ्या संबंधित उमेदवारांची उमेदवारी, कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

३.दिनांक ०५ जुलै, २०२१ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्गाकरिता आरक्षित असणारी पदे अराखीव पदांमध्ये रुपांतरित करण्यात आली आहेत.

४. दिनांक ३१ मे, २०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार आयोगाने प्रसिध्द केलेल्या दिनांक १७ जून, २०२१ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकानुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्ग ते आर्थिकदृष्टया दुर्बल घटक विकल्पाच्या अनुषंगाने आयोगाच्या अन्य परीक्षांसदर्भात उद्भवलेल्या न्यायालयीन प्रकरणांच्या पार्श्वभूमीवर प्रस्तुत दोन्ही जाहिरातीतील आर्थिकदृष्टया दुर्बल घटक प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या पदांचा निकाल राखीव ठेवण्यात आला आहे.

५. मुलाखतीचा तपशीलवार कार्यक्रम आयोगाच्या संकेतस्थळावर स्वतंत्ररित्या प्रसिध्द करण्यात येईल.

उपसचिव
परीक्षा राजपत्रित
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण- नवी मुंबई